| | |
|---|---|
| **CNR No.MHLA060002802020** | दाखल दिनांक : – ०१.०२.२०२०<br>नोंदणी दिनांक : – ०१.०२.२०२०<br>निकाल दिनांक :– १८.०५.२०२६<br>कालावधी :– **०६** वर्षे, **०३**महिने,**१७** दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,**

**न्यायालय क्र.१ अहमदपूर, ता.अहमदपूर, जि.लातूर यांचे न्यायालयात.**

**( पिठासीन अधिकारी – स्वानंदी दे. वडगांवकर )**

म. सं. कौ. का. अर्ज क्र.०५/२०२० **निशाणी क्र.१३**

CNR No.MHLA060002802020

| | | |
|---|---|---|
| अर्जदार | | **सोनाली भ्र. रामानंद सावंत,**<br>वय २२ वर्षे, धंदा– घरकाम,<br>रा.झोला (पिंपरी), ता.गंगाखेड, जि.परभणी,<br>हा. मु. शिंदगी (खु.), ता.अहमदपूर, जि.लातूर. |
| गैरअर्जदार | | **१. रामानंद पि. ज्ञानोबा सावंत,**<br>वय २७ वर्षे, धंदा– चालक,<br>**२. ज्ञानोबा पि. भगवान सावंत,**<br>वय ६० वर्षे, धंदा– व्यापार,<br>**३. फुलाबाई भ्र. ज्ञानोबा सावंत,**<br>वय ५५ वर्षे, धंदा– घरकाम व मजूरी,<br>**४. दयानंद पि. ज्ञानोबा सावंत,**<br>वय २२ वर्षे, धंदा– चालक,<br>**५. सई पि. ज्ञानोबा सावंत,**<br>वय २४ वर्षे, धंदा– घरकाम,<br>सर्व रा.झोला (पिंपरी), ता.गंगाखेड, |

| | | |
|---|---|---|
| | | जि.परभणी, |
| **अर्जदारांतर्फे विधीज्ञ** | | श्री. एस.एम.उप्पे. |
| **गैरअर्जदारांतर्फे विधीज्ञ** | | गैरअर्जदार क्र.१ ते ३ व ४ तर्फे श्री एस. आर. घाडगे व गैरअर्जदार क्र.५ तर्फे एकतर्फा. |

## न्या य नि र्ण य

## (निकाल दि.१८.०५.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी महिलांचे घरगुती हिंसाचार पासून संरक्षण कायदा, २००५ (घरगुती हिंसाचार कायदा) चे कलम १२ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराचे अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे;

०३. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी आहे. गैरअर्जदार क्र.२ हा अर्जदार हिचा सासरा, गैरअर्जदार क्र.३ सासु, गैरअर्जदार क्र.४ दीर, गैरअर्जदार क्र.५ व ६ नणंदा व गैरअर्जदार क्र.७ नंदावा म्हणजे गैरअर्जदार क्र.६ चा पती आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिस लग्नानंतर सुरूवातीचे ६ महीने चांगले नांदविले. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी तिच्याकडे गैरअर्जदार क्र.०१ यास पिकप ॲटो खरेदी करण्यासाठी रुपये एक लाखची मागणी केली व त्या मागणीच्या पुर्ततेकरीता तिला मारहाण केली. गैरअर्जदार क्र.४ व ५ हे अविवाहीत असून ते अर्जदार हिस स्वंयपाक, धुणी–भांडी करता येत नाही, अर्जदार घरातील पैसे चौरुन माहेरी नेते अशा वेगवेगळया कारणाने तिस अपमानास्पद बोलून अर्जदार हिचा माणसिक छळ करीत असत, तिचे केस ओढून व तिला मारहाण करुन शारीरिक त्रास देत असत. सन २०१७ दिवाळीमध्ये गैरअर्जदार यांनी त्यांच्या रुपये एक लाखाच्या मागणीच्या पुर्ततेकरीता अर्जदार हिस मारहाण करुन व शिवीगाळ करुन घरातून हाकलून दिले. त्यानंतर अर्जदार तिच्या माहेरी राहू लागली.

अर्जदाराचे आई–वडील, इतर नातेवाईक व गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती यांनी गैरअर्जदार यांची समजूत काढली व ते अर्जदारास घेवून गैरअर्जदार यांच्याकडे सोडण्यासयाठी गेले असता गैरअर्जदाराने त्यांना अपमानास्पद वागणूक देवून रुपये एक लाख दिल्याशिवाीय अर्जदारास नांदवणार नाही असे स्पष्ट सांगितले. त्याकाळात अर्जदार गरोदर राहिली असता गैरअर्जदार यांनी तिला नियमीत उपचार दिले नाहीत, तिला अवघड कामे करावयास लावली व रुपये एक लाख माहेरावरुन घेवून ये असे म्हणून तिचा पुन्हा मानसिक व शारीरिक छळ केला. ज्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा जन्मलेल्या नवजात मुलगा मरण पावला. त्यानंतर अर्जदार ही सासरी नांदावयास गेली असता, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिच्यामुळे त्यांचे मुल दगावले असे म्हणून तिस शारीरिक व मानसिक त्रास देण्यास सुरूवात केली. गैरअर्जदार क्र.१ हा रक्कमेच्या मागणीकरीता अर्जदारास लैंगीक स्वरुपाचा त्रास देवू लागला. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार कपडे बदलत असताना तिचे अश्लील फोटो मोबाईलमध्ये काढत असे, अर्जदार झोपेत असताना तिचे अर्धनग्न फोटो काढत असे, तसेच शारिरीक संबंध ठेवत असताना तिचे फोटो व व्हीडीओ तयार करीत असे व ते फोटो नातेवाईकांना पाठविण्याची धमकी देत असे. तिचे दुस–या व्यक्तीसोबत संबंध आहेत असे म्हणून तिच्या चारित्र्यावर संशय घेत असे. दिनांक २५/०२/२०१९ रोजी गैरअर्जदार यांनी अर्जदार हिच्या अंगावरील मणी–मंगळसुत्र व जोडवे काढून तिस हाकलुन दिले. तेंव्हापासुन अर्जदार ही तिच्या माहेरी मौजे सिंदगी येथे राहत आहे. गैरअर्जदार यांनी तिस दिलेल्या त्रासामुळे तिची मानसिकता ढासाळली आहे. गैरअर्जदार क्र.१ तिस वेळोवेळी फोन करुन जीवे मारण्याची धमकी देतो. दिनांक ०५/०१/२०२० रोजी गैरअर्जदार क्र.१ ने मौजे सिंदगी येथे येवून अर्जदाराच्या अंगावर बॅटरीचे ॲसीड टाकण्याचा प्रयत्न करुन तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. आजु–बाजूच्या शेजार–यांची गैरअर्जदार क्र.१ यास धमकावुन, हाकलून लावले.

**०४.** अर्जदाराचे पुढे कथन की, अर्जदाराकडे स्वतःचा उदरनिर्वाह करण्याचे साधन नाही. गैरअर्जदार क्र.१ हा ट्रकवर चालक असून त्यास प्रतिमहिना रूपये २५०००/– पगार मिळतो. गैरअर्जदार यांच्याकडे ३० शेळया व ५ जर्सी गाई असून त्यापासुन त्यांना खर्च वजा जाता वर्षाकाठी रूपये पाच लाख उत्पन्न मिळते. सबब, अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.१ कडून अर्ज दाखल केल्यापासून प्रतिमहा रूपये पंधरा हजार पोटगी, घरभाडे व दवाखना खर्च प्रत्येकी प्रतिमहा रूपये दोन हजार मंजुर करण्याची मागणी केलेली आहे. तसेच तिला केलेल्या मानसिक व शारीरिक छळापोटी नुकसान भरपाई रूपये पन्नास हजार देण्याची, अर्जदाराच्या लग्नामध्ये दिलेल्या गृहपयोगी वस्तु व हुंडा रक्कम रूपये पन्नास हजार व गैरअर्जदार यांनी अर्जदारास हाकलून दिले त्यावेळी तिचे काढून घेतलेले तीन तोळे सोन्याचे दागीने परत करण्याचे गैरअर्जदार क्र.१ यास आदेश देण्याची विनंती केली आहे.

**०५.** अर्ज गैरअर्जदार क्र.१ ते ३ व ५ यांच्या म्हणण्याशिवाय आहे. अर्ज गैरअर्जदार क्र.४ विरूध्द एकतर्फा आहे. अर्जदाराने गैरअर्जदार क्र.६ व ७ यांच्याविरुध्दचा अर्ज उचलून घेतला आहे.

**०६.** खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील कारणमीमांसेहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| अनु क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदार यांनी अर्जदार हिच्यावर कौटुंबीक हिंसाचार केला, असे अर्जदार शाबीत करते का? | **होय.** |
| २ | अर्जदार गैरअर्जदारांकडून कौटुंबीक हिंसाचार कायदा कलम २० अन्वये मासीक पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | **गैरअर्जदार क्र.१ विरूध्द होय, प्रतिमहा रूपये ३,०००/–.** |

| | | |
|---|---|---|
| ३ | अर्जदार गैरअर्जदारांकडून कौटुंबीक हिंसाचार कायदा कलम १९ अन्वये मासीक घरभाडे व दवाखाना खर्च मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | **नाही.** |
| ४. | अर्जदार गैरअर्जदारांकडून कौटुंबीक हिंसाचार कायदा कलम १८ ई अन्वये तिचे स्त्रीधन परत मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | **नाही.** |
| ५. | अर्जदार गैरअर्जदारांकडून कौटुंबीक हिंसाचार कायदा कलम २२ अन्वये नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास किती ? | **नाही.** |
| ६. | आदेश काय | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमीमांसा

०६. अर्जदार हिने अर्जाच्या पृठ्यर्थ निशाणी ८ कडे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. अर्जदाराने तिचे मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्र निशाणी १३ कडे दाखल केले आहे.

**मुद्दा क्र.१ करीता:—**

०७. अर्जदार हिने तिच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार केलेला आहे. गैरअर्जदार क्र.१ ते ३ व ५ च्या वतीने अर्जदाराचा उलटतपास घेण्यात आलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिचे पुराव्यातील कथने पुर्णपणे अखंडीत राहिलेली आहेत.

०८. अर्जदाराने सर्व गैरअर्जदारांविरूध्द त्यांनी तिच्याकडे रूपये एक लाख हुंडयाची मागणी केली, त्या मागणीच्या पुर्ततेकरीता तिस मारहाण केली, शिवीगाळ

केली तसेच तिच्यावर ॲसीड हल्ला करण्याचा प्रयत्न केला असे आरोप केलेले आहेत. याबाबी कौटुंबीक हिसांचार कायदा कलम ३ खाली नमुद कौटूंबीक हिसांचाराच्या व्याख्येमध्ये बसतात. त्याचप्रमाणे अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.१ विरूध्द त्याने तिचा लैगींक छळ केल्याचा आरोप केलेला आहे, तोही कौटुंबीक हिसांचाराच्या व्याख्येमध्ये बसतो. अर्जदाराने गैरअर्जदार क्र.४ व ५ हे तिस घरकाम येत नाही या कारणावरुन अपमानास्पद वागणूक देत असत असे कथन केले आहे. ज्यावरुन सर्व गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा कौटुंबीक हिसांचार केल्याचे सिध्द होते. सबब मी मुददा क्र.१ चे उत्तर सकारात्मक नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.२ करीता:-</u>

**०९.** अर्जदार हिने तिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. या उलट गैरअर्जदार क्र.१ हा ट्रक चालवतो व त्यापासून त्यास मासिक रूपये २५०००/- उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. वरील बाबी पुराव्याकामी अखंडीत राहिल्याने त्या पुराव्याकामी जशाच्या तशा वाचता येतील. अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्या एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नाबाबतही कथने केलेली आहेत. जी अखंडीत राहिलेली आहेत परंतु त्याबाबत अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. कोणत्याही कागदोपत्री पुराव्याशिवाय गैरअर्जदार क्र.२ व ३ यांचे वय विचारात घेता त्यांच्या उत्पन्नाबाबत अंदाज लावणे अयोग्य आहे. गैरअर्जदार क्र.१ शारीरिकदृष्टया अर्कायक्षम असल्याचा पुरावा अभिलेखावर नसताना तो शारीरिकदृष्टया कार्यक्षम आहे असे गृहीत धरता येईल. अशा परिस्थीतीत इतर गैरअर्जदार यांच्याविरुद्ध अर्जदारास आर्थिक मदतीचा आदेश करणे उचित नाही. अर्जदार हिने तिचे मालमत्ता व दायित्व शपथपत्र नि.१३ कडे सादर केले आहे. ज्याचे अवलोकन केले असता अर्जदार हिस कोणतेही उत्पन्न मिळवत नाही तसेच ती उत्पन्न मिळवण्यास कार्यक्षम नसल्याचे दिसून येते.

१०. गैरअर्जदार क्र.१ याचे अर्जदार हिने कथन केलेले उत्पन्न, तो शारिरीकदृष्ट्या तंदुरुस्त आहे ही बाब अल्पशिक्षीत इसमाची एका महिन्यामध्ये उत्पन्न मिळवण्याची क्षमता, एका व्यक्तीस सर्वसाधारण जगण्यासाठी लागणारा मासिक खर्च, या सर्व बाबींचा विचार करता गैरअर्जदार क्र.१ याच्याविरुद्ध अर्जदारास प्रतिमहा रुपये ३,०००/– अर्ज दाखल तारखेपासून पोटगी देण्याचे आदेश देणे न्यायाचे आहे. सबब, मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष मी गैरअर्जदार क्र.१ विरूध्द होकारार्थी नोंदवित आहे.

<u>**मुद्दा क्र.३ ते ५ करीता:–**</u>

११. अर्जदार हिने ती गैरअर्जदार यांच्यासोबत कोणत्या घरामध्ये एकत्रीत रहीवास करत होती, त्या घरामध्ये तिची राहण्याची स्वतंत्र व्यवस्था होऊ शकते किंवा कसे, तिला रहिवासासाठी स्वतंत्र घर घेणे आवश्यक आहे किंवा कसे, तिला कौटुंबिक हिंसाचारामुळे कोणत्या प्रकारच्या नुकसानीस सामोरे जावे लागले, तिस कोणती शारीरिक किंवा मानसिक व्याधी आहे जेणेकरुन तिला दवाखान्याचा खर्च करणे गरजेचे आहे, तिस लग्नामध्ये दिलेल्या गृहपयोगी वस्तू, सोने, हुंड्याची रक्कम याबाबत अर्जदार हिने कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. तसेच तिने इतर कोणत्याही साक्षीदारास तपासलेले नाही. अशा परीस्थितीमध्ये अर्जदाराच्या हक्कात घरभाडे, दवाखान्याचा खर्च, नुकसान भरपाई, हुंडा रक्कम, सोने, गृहउपयोगी वस्तु, याबाबत कोणताही आदेश करणे पुराव्याअभावी उचित वाटत नाही. सबब, मी मुद्दा क्र.३ ते ५ चे निष्कर्ष मी नकारात्मक नोंदवित आहे.

<u>**मुद्दा क्र.६ करीता:–**</u>

१२. वरील विवेचनाच्या अनुषंगाने अर्जदार हीने गैरअर्जदार क्र.१ ते ५ यांनी तिच्या विरुद्ध कौटुंबिक हिंसाचार केला असे सिद्ध केलेले आहे. ती गैरअर्जदार क्र.१ कडून मासिक रु.३,०००/– अर्ज दाखल तारखेपासून पोटगी मिळण्यास पात्र आहे.

अर्जदार ही पुराव्या अभावी तिच्या उर्वरित मागण्यांबाबत आदेश मिळवण्यास अपात्र आहे. याकारणास्तव मी खालील प्रमाणे आदेश पारीत करते;

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिस कौटुबिक हिंसाचार कायदा कलम २० प्रमाणे अर्ज दाखल तारखेपासून प्रतिमहा रुपये ३,०००/- पोटगी देण्याचे आहे.

३. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हीस प्रस्तुत अर्जाचा खर्च रुपये २,०००/- द्यावा.

४. प्रस्तुत आदेशाची प्रत विनामुल्य अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांना देण्यात यावी.

५. प्रस्तुत आदेश गैरअर्जदार क्र. १ यांना संरक्षण अधिकारी यांच्या मार्फत कळवण्यात यावा.

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.05.18 17:00:11 +0530

**स्थळ** – अहमदपूर.

**दिनांक** – १८.०५.२०२६.

**( स्वानंदी दे. वडगांवकर )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.०१), अहमदपूर.